admn17-18


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१६१७/१२२४ दि. २२ मे,२०१७

## परिपत्रक

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत शिरगाव, जि. रत्नागिरी येथे तीन वर्षाचा मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आला आहे. मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मत्स्य विज्ञान पदवी **(B.F.Sc)** अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमास गुणवत्ता व आरक्षणानुसार प्रवेश क्षमतेच्या २० टक्के अतिरिक्त जागांवर प्रवेश देण्यात येतात.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत मत्स्य विज्ञान पदवी **(B.F.Sc.)** अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी यासंदर्भात प्रवेश माहिती पुस्तिका **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यास अनुसरून मत्स्य अभियांत्रिकी पदविका धारकांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सदरची प्रवेश प्रक्रिया दि. २५/५/२०१७ पासून सुरु होत आहे. त्यांनी प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये दिलेल्या सूचनानुसार **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करावा.

**मा. महासंचालक
यांच्या मान्यतेने.**

**संचालक (शिक्षण)
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
पुणे**

प्रति,

१. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली
२. मत्स्य अभियांत्रिकी विद्यालय, शिरगाव जि. रत्नागिरी

यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक कृषी विद्यापीठ तसेच विद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करावे. तसेच कृषी विद्यापीठ व विद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी प्रवेश माहिती पुस्तिकेनुसार पुढील कार्यवाही करावी.

४. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.